# ओवाळा ओवाळा

Ovala Ovala — Sadguru Aarti · Sant Tukaram

ओवाळा ओवाळा माझ्या सद्गुरू राणा

माझ्या दयाळू राणा

पाचा ही तत्वांच्या ज्योती प्रकाशला ध्याना

निराकार वस्तू कैसी आकारा आली,

कैसी आकारा आली

सर्वाघटीं व्यापक, सर्वाघटीं व्यापक माझी सद्गुरू माउली

सोळा सहस्त्र बाहत्तर खिडक्या काया रचिली

गुरूने काया रचिली

नउ खिडक्यांचा जोड, नउ खिडक्यांचा जोड आत मूर्ती बैसविली

सप्त ही सागरांचा वेढा कैसा घातला,

वेढा कैसा घातला

तुका म्हणे बाप, तुका म्हणे बाप माझा कनवाळू आला

अखंड ओवाळा ओवाळा माझ्या सद्गुरू राणा

माझ्या दयाळू राणा

पाचा ही तत्वांच्या ज्योती प्रकाशला ध्याना